सत्यमेव जयते

# रोजगार हमी योजना समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## विसावा अहवाल

(वर्धा जिल्ह्याच्या संबंधात)

(हा अहवाल दिनांक १८ डिसेंबर २०१२ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१२

# रोजगार हमी योजना समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## विसावा अहवाल

(वर्धा जिल्ह्याच्या संबंधात)

एचबी १९३३—१

# रोजगार हमी योजना समिति
## (२०१२-२०१३)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.

(३) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.

(४) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.

(५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(६) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

(७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(८) श्री. शिवेंद्रसिंह राजे भोसले, वि.स.स.

(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.

(११) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१२) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स.

(१३) * डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

(१४) * श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

(१५) * श्री. संजय भेगडे, वि.स.स.

(१६) * प्रा. अतुल देशकर,वि.स.स.

(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.

(१८) कॅ. अभिजीत अडसूळ, वि.स.स.

(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(२०) श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.

(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

(२२) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.

(२३) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(२४) * श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(२५) श्री. भगवान साळुंखे, वि.प.स.

(२६) ** डॉ. दिपक सावंत, वि.प.स., निमंत्रित

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव,

(३) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती).

---

**टीप :** * डॉ. खुशाल बोपचे, सर्वश्री हरिष पिंपळे, संजय भेगडे व प्रा.अतुल देशकर, वि.स.स.यांची दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

** डॉ. दिपक सावंत, वि.प.स. यांची दिनांक २७ ऑगस्ट,२०१२ रोजी मा.सभापतीनी निमंत्रित सदस्य म्हणून फेर नामनियुक्ती केली.

# रोजगार हमी योजना समिति
## (सन २०१०-२०११)

**समिती प्रमुख**

(१) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(३) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(४) श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.

(५) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.

(६) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.

(७) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.

(८) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.

(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.

(११) श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.

(१२) श्री. राजीव देशमुख, वि.स.स.

(१३) श्री. दादाराव केचे, वि.स.स.

(१४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

(१५) श्री. सिंद्रामप्पा पाटील, वि.स.स.

(१६) श्री. शिवाजी कर्डिले, वि.स.स.

(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.

(१८) श्री. संजय राठोड, वि.स.स.

(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(२०) श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.

(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

(२२) * श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(२४) श्री. केशवराव मानकर, वि.प.स.

(२५) रिक्त **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

२. श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव,

३. श्री. विलास आठवले, उप सचिव,

४. श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी.

---

**टीप :** * श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स. यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै, २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.अनिल तटकरे, वि.प.स. यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१० रोजी मा.सभापतींनी सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.

** श्री. किरण पावसकर वि.प.स.यांनी दिनांक ७ जानेवारी, २०११ रोजी त्यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने अनुक्रमांक २५ वरील पद रिक्त दर्शविण्यात आले आहे.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | |
| १. | कामाचे वार्षिक नियोजन | १ |
| २. | निधीचा पुरवठा व खर्च | २ |
| ३. | मजुरांच्या सोयीसवलतींवर करण्यात आलेला खर्च | ३ |
| ४. | मजुरांची नोंदणी | ३ |
| ५. | मजुरीचे वाटप | ३ |
| ६. | अपूर्ण कामे | ४ |
| ७. | सामाजिक वनीकरण | ६ |
| | **परिशिष्ट :** | |
| | (एक) अपूर्ण कामे | ९ |
| | (दोन) बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | १३ |

## प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना "समितीचा प्रमुख" या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा विसावा अहवाल सादर करीत आहे.

मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद, यांनी अनुक्रमे दिनांक ३१ मे २०१२ व १ जून, २०१२ रोजी नियुक्त केलेल्या सदस्यांची सन २०१२-२०१३ या वर्षासाठी समिती गठीत केली. यापूर्वीच्या समितीने दिनांक ७ व ८ सप्टेंबर २०११ रोजी वर्धा येथे झालेल्या बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामात आलेल्या त्रुटी तसेच रोहयो अंतर्गत कामे करणा-या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणीवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्ह्यातील रोहयोची कामे करणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा झाली.

जिल्हा बैठकीमध्ये समितीसमोर आलेली प्रकरणे व कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पूर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करून ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पूर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ सप्टेंबर २०१२ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल, समितीचे सर्व सदस्य, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, वर्धा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, वर्धा व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरून समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने सदर अहवाल दिनांक ७ नोव्हेंबर ~~डिसेंबर~~ २०१२ रोजी विचारात घेतला व संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई, /नागपूर,
दिनांक : ७ नोव्हेंबर ~~डिसेंबर~~ २०१२.

**ॲड. सदाशिवराव पाटील**
समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

## रोजगार हमी योजना समितीचा

## अहवाल

**(१) कामाचे वार्षिक नियोजन :—**

वर्धा जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेच्या कामाची माहिती, लोकप्रतिनिधींना येणाऱ्या अडचणी व समस्या याची माहिती घेण्यासाठी रोजगार हमी योजना समितीने दिनांक ७ व ८ सप्टेंबर, २०११ रोजी वर्धा येथे बैठक घेतली. बैठकीच्यावेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील "कामाचे वार्षिक नियोजन" या संदर्भात सन २००५-२००६ व सन २००६-२००७ या कालावधीचे वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरूप समितीला सादर करण्यात आले. सन २००५-२००६ मध्ये वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करण्यास कार्यालयीन पुर्ततेमुळे विलंब झाला असे नमूद केले आहे. प्रस्तुत बाब समितीने विचारात घेऊन समितीने विचारणा केली की, वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करण्यास विलंब झाल्याची कारणे काय आहेत व त्याला जबाबदार असणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे. यावर जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली की, सप्टेंबर अखेर पर्यंत आराखडा पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु, सन २००५-२००६ मध्ये ऑक्टोबर महिन्यात आराखडा तयार करण्यात आला. आराखडा तयार करण्यास एक महिन्यांचा विलंब झाला आहे. सन २००६-२००७ चा आराखडा विहित मुदतीत तयार करण्यात आला आहे.

सन २००४-२००५ ते सन २०११-२०१२ च्या वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरूप यामध्ये माहिती दिली आहे की, जलसंवर्धन, पाटबंधारे, वनीकरण, रस्ते, अंतर्गत रस्ते, शेत रस्ते या कामावरील खर्च ५५.१४ टक्के, ५.०५ टक्के, १०.२२ टक्के, २९.५९, १००.०० टक्के असा तंतोतंत दाखविण्यात आला आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे काय मत आहे. अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती दिली की, सन २००६-२००७ मध्ये ७० टक्के जलसंवर्धनाची कामे आणि ३० टक्के रस्त्यांची कामे घ्यावीत व तशा प्रकारचे नियोजन करावे असे शासनाचे आदेश होते. अशा प्रकारे शासनाने कामांची टक्केवारी ठरवुन दिल्यामुळे आराखडा तयार करताना रस्त्यांच्या कामांची टक्केवारी ३० टक्क्यांवर आणली होती. सन २००४-२००५ व सन २००५-२००६ च्या आकडेवारी नुसार जलसंवर्धनाची कामे अनुक्रमे १३४ व १३४ आणि रस्त्यांची कामे अनुक्रमे १७२ व १६५ अशी होती. त्यानंतर शासनाकडून असे आदेश आले की, जलसंवर्धनाची कामे जास्त घ्यावीत. त्यामुळे सन २००६-२००७ मध्ये जलसंवर्धनाची ३३६ कामे घेण्यात आली व रस्त्यांची २३ कामे घेण्यात आली आहेत. याबाबत समितीने विचारणा केली की, अशा प्रकारचे आदेश देण्यात आले होते किंवा कसे याबाबतचा खुलासा शासनाच्या प्रतिनिधींनी करावा. यावर विभागाने माहिती दिली की, जलसंवर्धनाची कामे घ्यावीत असे आदेश देण्यात आले होते. तद्नंतर समितीने विचारणा केली की, सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात एमआरईजीएस योजना आली त्यापूर्वी सन २००६-२००७ मध्ये ही योजना नव्हती. एमआरईजीएस योजना आल्यानंतर ७०.३० चे प्रमाण लागू करण्यात आले. ज्या वर्षाची चर्चा करीत आहोत, त्या वर्षामध्ये रोजगार हमी योजना होती. त्यामध्ये असे प्रमाण लागू नव्हते. याबाबत शासनाने असा खुलासा केला की, रोजगार हमी योजनेमध्ये प्रमाण ठरवून देण्यात आले नव्हते. सन २००६-२००७ च्या फेज-१ मध्ये एमआरइजीएस योजना सुरू झाली होती. फेज-२ मध्ये वर्धा जिल्ह्याचा समावेश करण्यात आला. सन २००६-२००७ मध्ये रस्त्यांची ३० टक्के व जलसंवर्धनाची ७० टक्के कामे घ्यावीत, असे आदेश देण्यात आले होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २००४ ते २००७ या वर्षामध्ये ३० टक्क्यांप्रमाणे रस्त्यांची कामे दाखविण्यात आली आहेत व शासनाच्या आदेशानुसार नियोजन करण्यात आले आहे, एमआरईजीएस योजना लागू झाल्यानंतर जलसंवर्धनाची ७० टक्के आणि रस्त्यांची ३० टक्के कामे घ्यावीत, असे आदेश देण्यात आले होते. एमआरइजीएस योजना सन २००७-२००८ मध्ये लागू झाली आहे. ही सन २००४ ते २००७ मधील कामे आहेत. एमआरईजीएसचे निकष आणि ईजीएसचे निकष वेगवेगळे आहेत. यावर उप आयुक्त रोहयो यांनी समितीला माहिती दिली की, पूर्वी रोजगार हमी योजनेमध्ये जलसंवर्धनाची ४० टक्के कामे घेता येत होती. त्यानंतर ही टक्केवारी ५५ टक्के करण्यात आली. कृषीची २० टक्के होती, ती टक्केवारी तशीच ठेवली. वनीकरणाची १५ टक्के होती ती १० टक्क्यांवर आणली. रस्त्यांची २५ टक्के होती, ती ३० टक्के करण्यात आली. त्यावेळी जे निकष होते, त्याप्रमाणेच नियोजन मान्य करण्यात आले आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

समितीला वार्षिक नियोजनाबाबत मोघम स्वरूपाची माहिती पुरविण्यात आली. सन २००५-२००६ चा वार्षिक नियोजन आराखडा तयार करून मंजुरी मिळविण्यास विलंब झालेला असल्याने विकासाच्या कामावर परिणाम झाला यास्तव समिती तीव्र नाराजी व्यक्त करते व सदर मंजुरीस विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.

वार्षिक नियोजनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जलसंवर्धनाची ५५ टक्के, पाटबंधाऱ्याची ५ टक्के, वनीकरण/सामाजिक वनीकरणाची १० टक्के व रस्ते व इतर ३० टक्के याप्रमाणे कामाचे वार्षिक नियोजन करणे आवश्यक असताना वर्धा जिल्ह्यात सन २००६-२००७ या कालावधीत जलसंवर्धनावर ७० टक्के इतका खर्च तसेच रस्त्यांची कामे ३० टक्के इतका खर्च होण्याच्या संदर्भात समितीला दिलेली माहिती असमाधानकारक असून यंत्रणांनी विहित मार्गदर्शक तत्त्वानुसार कामे घेण्यासाठी पुरेसे प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. जलसंवर्धनाची व रस्त्यांची कामे जास्तीत जास्त घेण्यासाठी योग्य पद्धतीने नियोजन करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

**(२) निधीची पुरवठा व खर्च :—**

जिल्हा बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील "निधीचा पुरवठा व खर्च" या संदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००४ ते २००७ या कालावधीत प्राप्त झालेल्या निधीपेक्षा अधिकचा खर्च झालेला असल्याने अधिकची रक्कम कोणत्या माध्यमातून उपलब्ध करण्यात आली आहे यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, त्यामध्ये फक्त केंद्र सरकारकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची आकडेवारी देण्यात आलेली आहे. राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त झाले असून ते दर्शविण्यात आलेले नाही. म्हणून अधिकचा खर्च दिसून येत आहे. यावर समितीने विचारणा केली की, केंद्र शासनाकडून मिळालेले अनुदान, राज्य शासनाकडून मिळालेले अनुदान व झालेला एकूण खर्च याची विगतवारी समितीला सादर करावी. यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, सन २००४-२००५ मध्ये केंद्र शासनाकडून ६ कोटी ७२ लाख, ८० हजार अनुदान प्राप्त झाले. त्या तुलनेत राज्य शासनाकडून २ कोटी ६० लाख, ४२ हजार रुपये एवढी रक्कम प्राप्त झाली. सन २००५-२००६ मध्ये केंद्र शासनाकडून ८ कोटी, ९७ लाख, ३० हजार रुपये व राज्य शासनाकडून २ कोटी, ४७ लाख, ८७ हजार रुपयांचा निधी प्राप्त झाला. समितीने विचारणा केली की, ही योजना केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येत असल्यामुळे केंद्र व राज्य सरकारकडून मिळालेल्या अनुदानाचा उल्लेख असणे गरजेचे आहे. तसेच प्रकल्प अधिकाऱ्यांनी एकूण प्राप्त झालेला निधी व खर्च यांची माहिती, विगतवारीनुसार दिली असती तर बरे झाले असते. केंद्रशासनाकडून मिळालेले अनुदान व खर्च झालेली रक्कम यामध्ये तफावत असल्यामुळे उर्वरित निधी कोणाकडून प्राप्त झाला, हे स्पष्ट करणे गरजेचे होते.

यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीला अशी पुढील माहिती दिली की, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेमार्फत केंद्र शासनाकडून मिळालेले अनुदान व कामावर झालेला एकूण खर्च यात तफावत नसून विचारण्यात आलेल्या माहितीनुसार केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीची आकडेवारी देण्यात आलेली असून कामावर एकूण झालेला खर्च हा केंन्द्र व राज्य व इतर प्राप्त यातून एकत्रित दर्शविण्यात आलेला आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे :—

| वर्ष | केंद्र अनुदान |
|---|---|
| २००४-२००५ | ६७२.८० |
| २००५-२००६ | ८९७.३८ |
| २००६-२००७ | १२१२.९२ |

वरीलप्रमाणे केंद्र अनुदान प्राप्त झाले असून त्यासमरूप राज्य अनुदान प्राप्त झाले असून करण्यात आलेला खर्च केंद्र व राज्य एकत्रित करण्यात आलेला आहे.

| वर्ष | प्राप्त केंद्र अनुदान | प्राप्त राज्य अनुदान | एकूण | झालेला एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| २००४-२००५ | ६७२.८० | २६०.४२ | ९३३.२२ | ९२६.९० |
| २००५-२००६ | ८९७.३८ | २४७.८१ | ११४५.१९ | ११५०.७० |
| २००६-२००७ | १२१२.९२ | ३२९.४० | १५४१.९६ | १३३८.४६ |

वरीलप्रमाणे मिळालेले अनुदान मागील शिल्लक व इतर प्राप्त या प्रमाणे झालेला खर्च लक्षात घेता मिळालेले अनुदान व खर्च यामध्ये तफावत नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

समितीच्या असे निदर्शनास आले की, केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेली अनुदानाची रक्कम खर्च करताना विविध यंत्रणांनी करावयाच्या कामाचे सुयोग्यरित्या नियोजन केलेले नाही. त्यामुळे वर्धा जिल्ह्यामध्ये ही योजना राबविणाऱ्या विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्याने ही योजना राबविण्यात स्वारस्य नाही असे समितीला वाटते. ही बाब जिल्हाधिकाऱ्यांनी गंभीरतेने घेणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी विविध यंत्रणांच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सक्त सूचना द्याव्यात व कामाचा वारंवार आढावा घ्यावा आणि या संबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

एनआरईजीएस योजना देशभरात सुरू केल्यानंतर देशातील सर्व राज्यांनी त्यांची अंमलबजावणी तातडीने केली. महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजना सुरू असल्याने मग्रारोहयो अंतर्गत अद्याप पाहिजे तसे काम सुरू झालेले नाही. असे समितीला प्रकर्षाने जाणवले, राज्यामध्ये मग्रारोहयो अंतर्गत कामाचे नियोजन मोठया प्रमाणात करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी जास्तीत जास्त निधी केंद्र शासनाकडून मिळविण्याच्या दृष्टीने शासनामार्फत पाठपुरावा करण्यात यावा अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

**(३) मजुरांच्या सोई-सवलतीवर करण्यात आलेला खर्च :—**

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेत "मजुरांच्या सोई-सवलतींवर" करण्यात आलेल्या खर्चाच्या संदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००६-२००७ मध्ये ५.४८ टक्के व सन २००७-२००८ मध्ये ४.०२ टक्के व ५.३२ टक्के खर्च झाला आहे. या वर्षामध्ये मजुरांच्या सोयी-सवलतींवर ३ टक्क्यांपेक्षा अधिकची रक्कम खर्च झाल्याचे दिसून येत असल्याने याबाबतची कारणे स्पष्ट करावीत. तसेच सन २००४-२००५ व सन २००५-२००६ या वर्षी रोजगार हमी योजनेच्या कामांची मागणी नसल्यामुळे कामे झालेली नसल्याने या वर्षांचा वार्षिक आराखडा समितीला सादर करावा तसेच त्यावर्षीची ब्ल्यूप्रिंट काय होती आणि अंमलबजावणी झालेली नसल्याने त्याबाबतची माहिती द्यावी. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी अशी माहिती दिली की, या कामावर ८६१५ रुपये इतका खर्च झालेला आहे. सोई-सवलतींवर जेवढा खर्च व्हायला पाहिजे होता त्यापेक्षा जास्त खर्च झालेला असून नियमांचे उल्लघंन झालेले आहे तसेच कनिष्ठ अभियंत्यांकडून रक्कम वसूल करून ती शासनाकडे जमा केलेली आहे. याबाबत संबंधितांवर कारवाई का झाली नाही अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हा परिषदेने प्रस्ताव पाठविल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. असे उप आयुक्त (रोहयो) यांनी समितीस अवगत केले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

मजुरांच्या सोई-सवलतीवर खर्च करण्यासाठी शासन निर्णयानुसार एकूण खर्चाच्या ३ टक्के इतकी रक्कम खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे. परंतु समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, सन २००६-२००७ व सन २००७-२००८ या वर्षात ३ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम मजुरांच्या सोई-सवलतींवर विविध यंत्रणाद्वारे खर्च करण्यात आली आहे. ३ टक्क्यापेक्षा जास्त रक्कम खर्च करणे उचित नाही असे समितीला वाटते. त्यामुळे मजुरांना शासन निर्णयानुसार विहित मर्यादेत सोईसवलती पुरविण्याबाबत वर्धा जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी योग्यरित्या काळजी घेणे आवश्यक आहे अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

**(४) मजुरांची नोंदणी :**

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेनुसार समितीने विचारणा केली की, सन २००४-२००५ पासूनची माहिती विचारलेली असताना पुस्तिकेत सन २००३-२००४ पासूनची माहिती दिलेली आहे. "मजुरांची नोंदणी" या शीर्षाखाली देण्यात आलेल्या माहितीमध्ये मजुरांची संख्या दिलेली आहे. परंतु मागणी केलेल्या मजुरांची संख्या "निरंक" दाखविण्यात आलेली आहे. सन २००३-२००४ ते सन २००५-२००६ या कालावधीत मजुरांची नोंद झालेली असताना कामाची मागणी केलेल्या मजुरांची संख्या "निरंक" दाखविण्यात आलेली आहे. सन २००६-२००७ मध्ये काही मजुरांनी मागणी केल्याचे दाखविण्यात आले आहे. सन २००५-२००६ मध्ये ४५१६ मजुरांची नोंद झाली आहे. मजूर उपलब्ध असताना कामाची मागणी नाही, हिबाब गंभीर आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी समितीला माहिती दिली की, मजुरांची नोंद केलेली असते. परंतु, जर काम हवे असेल तर नमुना ४ मध्ये कामाची मागणी करावी लागते. नमुना ४ मध्ये कामाची मागणी प्राप्त न झाल्यामुळे माहिती "निरंक" दाखविण्यात आलेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :—**

सन २००३-२००४ ते सन २००५-२००६ या कालावधीत मजुरांची नोंद झालेली असताना मागणी केलेल्या मजुरांची संख्या निरंक दाखविण्यात आली आहे. तसेच सन २००५-२००६ मध्ये ४५१६ मजुरांची नोंद झाली आहे. मजूर उपलब्ध असतांना कामाची मागणी झाली नाही असे समितीला सांगण्यात आले. रोजगार हमी योजनेमध्ये कामे निर्माण करणे, मजूर उपस्थित राहण्यासाठी प्रयत्न करणे, अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही यंत्रणेने केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे असे समितीला प्रकर्षाने जाणवले. तरी ही योजना राबविणाऱ्या यंत्रणांनी जिल्ह्यात जास्तीत जास्त कामे घेणे व जास्तीत जास्त मजूर कामावर उपस्थित राहण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत अशी समितीची शिफारस आहे.

**(५) मजुरीचे वाटप :—**

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील मजुरीचे वाटप या संदर्भात समितीने विचारणा केली की, हजेरीपटाच्या दिलेल्या माहितीमध्ये ५ आठवड्यांपेक्षा जास्त आठवडे विलंब झालेल्या हजेरीपटाचा कालावधी देण्यात आला आहे. सन २००६-२००७ मध्ये जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, वर्धा या यंत्रणेच्या कामामध्ये १ हजेरीपट १० आठवडे, ९ आठवडे, ८आठवडे, ७ आठवडे, ६ आठवडे असा विलंब झालेला असल्याने याची कारणे स्पष्ट करावीत. यावर विभागीय अधिकाऱ्यांनी अशी माहिती दिली की, सन २००६-२००७ मधील परिस्थितीचे अवलोकन केले तर त्या काळात या भागामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे लोण पसरले होते. कार्यालयातील अभ्यागतांची संख्या त्या काळात मोठया प्रमाणावर वाढलेली होती. त्याचप्रमाणे त्यावेळी कृषी सहायक नव्याने कामावर रुजू झाले होते. त्यामुळे चूक झालेली आहे. याबाबत समितीने विचारणा केली की, संबंधित कृषी अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन सुरू करण्यात आलेल्या प्रशासकीय कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे. निधी प्राप्त झाल्यानंतरही विलबांने मजुरीचे वाटप करणे, हा कायद्याने गुन्हा आहे. मजुरीचे तात्काळ वाटप करणे अपेक्षित आहे व संबंधित यंत्रणेची ती जबाबदारी आहे.निधी प्राप्त झाल्यानंतरही मजुरी वाटपास ६ ते १० आठवड्यांचा विलंब झाला आहे, त्या कालावधीत हा निधी संबंधित अधिकाऱ्यांनी वापरला आहे. हा शासकीय निधी असल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यास तो वापरण्याचा अधिकार नाही. त्यामुळे शासकीय निधींचा अयोग्य कारणासाठी वापर केल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक होते.

यावर उप आयुक्त, रोहयो, वर्धा यांनी समितीला अशी माहिती दिली की, संबंधित यंत्रणेकडून सन २००८ मध्ये प्रस्ताव सादर करण्यात आले होते. दिनांक २२-८-२००८ रोजी जिल्हाधिकाऱ्यामार्फत प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत. त्या प्रस्तावासंदर्भात खुलासा मागविण्यात आला होता व त्याबाबत ४-५ स्मरणपत्रेही पाठविण्यात आली आहेत. नेमका विलंब कोणत्या स्तरावर झालेला आहे व कोणत्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून विलंब झाला आहे, निधीची मागणी केव्हा करण्यात आली होती, निधी कधी प्राप्त झाला होता, निधी वाटपास विलंब का झाला, याबाबतची माहिती विभागाकडून मागविण्यात आली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले. अशा प्रकरणांमध्ये नेहमीच खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येते, असा अनुभव आहे. कृषी सहायक, ग्राम सेवक यांच्यावर कारवाई केली तर चुकीचा संदेश जातो. त्याऐवजी नियंत्रण अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखालील काम करण्यात येते, त्यांचे कामाच्या सर्व क्षेत्रावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. कामाचा दर्जा, मजुरांच्या सोई-सुविधा, मजुरींचे वाटप व इतर अनुषंगिक बाबींकडे नियंत्रण अधिकाऱ्यांचे लक्ष असले पाहिजे. त्यांचे जर नियंत्रण असेल तर असे प्रकार घडत नाहीत. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केलेली आहे, त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी हे सर्व प्रकरण तपासावे व समितीच्या सूचना लक्षात घेऊन कारवाईचा योग्य प्रस्ताव आयुक्त कार्यालयाला सादर करावा. या प्रकरणी उप आयुक्तांनी लक्ष घालून समितीने केलेल्या सूचनानुसार कारवाई करावी.

**अभिप्राय व शिफारशी :—**

रोजगार हमी योजनेच्या कामांवर काम करीत असलेल्या मजुरांना मजुरी वेळेवर दिली जाते किंवा कसे याबाबत समितीने माहिती घेतली असता मजुरांना मजुरी मिळण्यास ६ ते १० आठवड्याचा विलंब झाल्याचे समितीला दिसून आले. मजुरीचे वाटप उशिरा करण्यात आल्याबाबत संबंधितांवर कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नसून विविध यंत्रणांनी या संदर्भात सादर केलेला खुलासा समाधानकारक वाटत नसल्याने मजुरी वाटपास उशिर होण्यास कारणीभूत असलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा तसेच मजुरांना रोजगार हमी योजनेच्या कामाची मजुरी वेळेवर अदा करण्यासाठी शासनाने तात्काळ एक निश्चित स्वरूपाची उपाययोजना करावी अशी समिती शिफारस करीत आहे.

**(६) अपूर्ण कामे :—**

समितीच्या दि. ७ व ८ सप्टेंबर, २०११ रोजी जिल्हा बैठकीत दिलेल्या आश्वासनानुसार दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, गणेशपूर गाव तलावाचे काम दिनांक २६ ऑगस्ट, १९८८ पासून बंद असल्याने या प्रकरणी काय कार्यवाही केली व या कामाची सद्यःस्थिती काय आहे ? यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, सदरहू काम दिनांक ७ मे, २०१२ नुसार रोजगार हमी योजनेतून वगळण्यात आलेले आहे. सदरहू काम जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आले असून त्यांच्याकडून या प्रकरणी कार्यवाही करून घेण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, गणेशपूर गाव तलावाचे काम १.९८ हेक्टरवर करण्यात येत होते. ही जमिन मुळात वन विभागाची आहे. या तलावाचे काम ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. हे काम ज्या जमिनीवर करण्यात आले त्यातील बहुतांश जमीन वन विभागाची आहे. मुळात सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर काम सुरू करावयास हवे होते. आता लघु पाटबंधारे विभागाकडून सांगितले जाते की, हे काम वन विभागाने पूर्ण करावे. सदरहू काम वन विभागाला करावयाचे झाल्यास वन विभाग अगोदरचे आणि नंतरचे एस्टीमेटं तयार करून वन विभागाकडे पैसे वर्ग करावेत असे सांगत आहे. जिल्हाधिकारी, वर्धा यांनी सदरहू काम वगळून ते जि.प. वर्धा यांच्याकडे वर्ग केलेले आहे. एका प्रकल्पाचे काम ८० टक्के पूर्ण होते याचा अर्थ त्या कामावर प्रकल्पाच्या किमतीच्या ८० टक्के रक्कम खर्च झालेली आहे. ८० टक्के रक्कम खर्च करून सुध्दा त्या प्रकल्पांचा काही उपयोग होत नाही. समितीचे मत आहे की, या प्रकल्पावर झालेला खर्च वाया गेला आहे. यावर कार्यकारी अभियंता (पाटबंधारे) यांनी सांगितले की, या प्रकल्पातील ०.१६ हेक्टर जमीन महसूल विभागाची आणि १.९८ हेक्टर जमीन वन विभागाची आहे. या प्रकल्पाचे एकूण क्षेत्र २.१४ हेक्टर आहे. वन विभागाकडून एन.पी.व्ही. आणि वनीकरणाचा वाढीव निधी याची रक्कम २५,९७,७६६/- इतकी आली आहे. सदरहू रक्कम भरण्याबाबत वन विभागाने कळविल्यामुळेच ही रक्कम भरेपर्यंत हे काम थांबलेले आहे. समितीने पुढे असेही विचारले की, यामध्ये वन विभाग आणि महसूल विभागाचा समन्वय असता तर वाद निर्माण झाला नसता. या कामावर ८० टक्के खर्च झाला असून, केवळ २० टक्के खर्च होणे बाकी आहे. ८० टक्के रक्कम खर्च करूनही ते काम वादातीत आहे. एकंदरीत या प्रकल्पावर केलेला ८० टक्के खर्च वाया गेला असून हे काम पूर्ण करण्यासाठी वन विभागाकडे किती रक्कम भरावयाची आहे याबाबतची माहिती द्यावी. यावर कार्यकारी अभियंता (पाटबंधारे) यांनी सांगितले की, सुरुवातीला १.६३ लाख रुपये भरावयाचे होते. परंतु त्या वेळी ही रक्कम न भरल्यामुळे त्यात वाढ होऊन एन.पी.व्ही. चे रु. १२,३९,४८०/- आणि वनीकरणाच्या वाढीव निधीपोटी १३,५८,२८६/- रुपये असे एकूण २५,९७,७६६/- इतकी रक्कम वन विभागाकडे जमा करावयाची आहे.

तसेच जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, गणेशपूर तलावाचे काम १९८८ मध्ये सुरू झाले होते. त्यावेळी या कामाची किंमत १.५६ लाख रुपये होती. संबंधित यंत्रणेने त्यावेळी हे काम केले. त्यानंतर त्यांनी हे काम वन विभागाकडे वर्ग केले. सुरुवातीच्या काळात एन.पी.व्ही. म्हणून १.६३ लाख रुपये भरावयाचे होते. त्यावेळी पैसे जमा करण्याचा प्रस्ताव पाठविला नाही. पहिला टप्पा झाल्यानंतर वन विभागाकडे पैसे जमा करण्यात आले. परंतु त्याच दरम्यान दुसऱ्या टप्प्याचे पैसे भरण्यात आले नाही. तद्नंतर दरवर्षी वन विभागाकडे भरणा करावयाच्या रकमेमध्ये वाढ होत गेली. आजच्या घडीला वन विभागाकडे एन.पी.व्ही. आणि वनीकरणाच्या वाढीव मोबदल्यापैकी २५,९७,७६६/- रुपये जमा करावयाचे आहेत. शासन निर्णयामध्ये

नमूद केले आहे की, एखाद्या कामावर १० टक्के खर्च झाला असेल तर ते काम रोजगार हमी योजनेतून वगळता येते. गणेशपूर तलावाच्या कामावर ८० टक्के खर्च झाल्यामुळे ते काम वगळता येत नव्हते. हे काम पूर्ण होण्यासाठी वन विभागाकडे पैसे भरण्यासाठी पाठपुरावा सुरू होता. परंतु प्रयत्न करूनही ती रक्कम वन विभागाकडे भरता आली नाही. शिवाय हे काम रोजगार हमी योजनेतून करण्यासाठी फिजीबल नाही. या कामाची सध्याची अंदाजपत्रकीय रक्कम बघीतली तर ती पूर्वीच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या कितीतरी जास्त येते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन १९८८ मधील अंदाजपत्रकाला १० टक्के खर्चाचा नियम लावणे योग्य होणार नाही. रोजगार हमी योजनेतून लोकोपयोगी कामांवर शासनाचे पैसे खर्च व्हावेत अशी समितीची अपेक्षा आहे. समितीसमोर सन १९८८ सालातील प्रकरण येत असेल आणि तरी सुद्धा त्याला मोघम उत्तर मिळत असेल तर ते योग्य नाही. यावर प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी माहिती दिली की, नरेगा सुरू झाल्यानंतर रोजगार हमी योजनेची जी कामे अपूर्ण आहेत त्या कामांची १०० टक्के तपासणी प्रक्रिया सुरू करण्यात आली. संबंधित विभागातील इंजिनियर, तहसीलदार आणि अन्य एक अधिकारी अशा प्रकारे तीन अधिकाऱ्यांची स्पेशल टीम करून अपूर्ण कामांच्या ठिकाणी भेटी देऊन त्या बाबतचा आढावा घेतला. अशा प्रकारे सन २००० पर्यंतच्या अपूर्ण कामांपर्यंत येऊन पोहचलो आहोत. यामध्ये सुधारणा करण्यासाठी विभागाकडून मेहनत घेतली जात आहे. १०० टक्के सुधारणा होईल हे आताच सांगणे योग्य नाही. परंतु ४-५ जिल्ह्यामधील हा विषय आहे.

यावर समितीने विचारले की, राज्यात नरेगा योजना लागू करण्याचे ठरविल्यानंतर विभागाच्या प्रधान सचिवांनी राज्याच्या रोजगार हमी योजनेतील अपूर्ण कामांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला. राज्याची रोजगार हमी योजना पूर्वीप्रमाणेच सुरू ठेवली असती तर अशा प्रकारचा आढावा घेतला गेला नसता. ती अपूर्ण कामे तशीच प्रलंबित असती. नरेगामध्ये जुन्या आणि नवीन कामांची सांगड घातल्यामुळे ती कामे मार्गी लागली. समितीच्या मते आजही रोजगार हमी योजनेची अनेक कामे अपूर्णावस्थेत आहेत. आपल्या स्तरावरून हा प्रश्न सोडवावा अशी समितीची अपेक्षा आहे. यावर प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी सांगितले की, काही कामे सुरू होऊन २०-२५ वर्षे झालेली आहेत. त्या काळातील कागदपत्रे सापडत नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे त्यावेळी असलेले अधिकारी देखील एक तर बदलून गेलेले आहेत किंवा निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी वेळ जात आहे. याबाबत समितीने स्पष्ट केले की, रोहयोची कामे बऱ्याच कालावधीपासून अपूर्ण असल्याचे समितीच्या निदर्शनास येत असून समितीच्या माध्यमातून त्याची चौकशी होते. परंतु मूळ काम तसेच राहत आहे. काम पूर्ण होणे आवश्यक आहे. यावर प्रधान सचिव नियोजन विभाग (रोहयो) यांनी एकूण किती कामे प्रलंबित आहेत याची माहिती समितीला देण्यात येईल असे स्पष्ट केले.

गणेशपूर गावतलावाचे काम हे जि.प.वर्धा यांचेकडे हस्तांतरित करण्यात आलेले असून त्यांचेकडून पूर्ण करून घेण्यात येईल. हे काम पूर्ण झाले असते तर त्या परिसरातील लोकांना पाणी मिळाले असते. वर्धा जिल्हा हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जात असल्याने या कामाच्या हस्तांतरण प्रक्रियेचा नेमका कालावधी स्पष्ट करावा असे समितीने सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अवगत केले की, काम हस्तांतर करून घेण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. विभागाचे कार्यकारी अभियंता आणि पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांची संयुक्त बैठक झालेली आहे. कामाचे मोजमाप करण्याचा निर्धार झालेला आहे. नियमित योजनेतून काम पूर्ण करून घेण्यात येणार आहे. विभागाचे कार्यकारी अभियंता आणि पाटबंधारे खात्याचे कार्यकारी अभियंता कामाची संयुक्त मोजणी करीत आहेत. समितीने पुढे असे स्पष्ट केले की, जिल्हा परिषदेमार्फत हे काम पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन समितीला द्यावे तसेच काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करून अहवाल पाठविण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी सांगितले की, तीन महिन्यात काम पूर्ण करून तसा अहवाल समितीला पाठविण्यात येईल.

तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली की, समितीने निर्देश दिल्यानंतर मी स्वतः व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक आठवड्यामध्ये वर्धा जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व पदाधिकारी, सरपंच, ग्रामसेवक यांची एक दिवसाची कार्यशाळा घेऊन त्यांना 'नरेगा' संबंधी सविस्तर माहिती दिली. वर्धा जिल्हा हा पूर्वीपासून नॉन-ईजीएस म्हणून विचार करण्यात आला होता. शिवाय जिल्ह्यातून रोहयोच्या कामाची मागणी देखील करण्यात आली नव्हती. सन २००७ मध्ये 'नरेगा' दुसऱ्या टप्प्यामध्ये सुरू झाली तेव्हा देखील कामाची मागणी नव्हती. सन २००७ ते २०१० या कालावधीत या योजनेवर खूप कमी खर्च झाला. तसेच वर्धा जिल्हा शेतकरी आत्महत्या ग्रस्त जिल्हा असल्यामुळे व जिल्ह्यातील गावांमध्ये ५० पैशापेक्षा कमी आणेवारी होती. त्यामुळे कामाची मागणी नसल्यामुळे तक्त्यामध्ये कामे निरंक दाखविण्यात आली आहेत.

**अभिप्राय व शिफारशी :—**

वर्धा जिल्ह्यात पुर्वीपासूनच रोहयोच्या कामाची मागणी देखील करण्यात आली नव्हती. सन २००७ मध्ये 'नरेगा' चा दुसरा टप्पा सुरू झाला तेव्हाही कामाची मागणी नव्हती. सन २००७ ते २०१० या कालावधीत या योजनेवर खूप कमी खर्च झाला. वर्धा जिल्हा हा शेतकरी आत्महत्या ग्रस्त जिल्हा असल्यामुळे व जिल्ह्यातील गावांची ५० पैशापेक्षा कमी आणेवारी असल्याने समितीने निर्देश दिल्यानंतर जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक आठवड्यामध्ये वर्धा जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व पदाधिकारी, सरपंच, ग्रामसेवक यांची एक दिवसाची कार्यशाळा घेऊन त्यांना 'नरेगा' संबंधी सविस्तर माहिती दिली त्यामुळे जिल्ह्यात नरेगाची कामे सुरू झाली आहेत. तथापि, अद्यापही जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामाची पाहिजे त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. त्यामुळे या जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची जास्तीतजास्त कामे घेऊन तेथील लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी जास्तीतजास्त प्रयत्न करावेत तसेच गणेशपूर गाव तलावाचे काम तीन महिन्यात पूर्ण करून कामाच्या पुर्ततेचा अहवाल सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**(७) सामाजिक वनीकरण :—**

समितीच्या जिल्हा बैठकीच्यावेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील "सामाजिक वनीकरण" या संदर्भात समितीने विचारणा केली की, अंदाजपत्रकाप्रमाणे १.६५ हजाराचे काम असताना १४ हजारात काम पूर्ण झाल्याचे नमूद केले आहे. तसेच या ठिकाणी अंदाजपत्रकातील रक्कम खर्च न होण्याची जी कारणे दिलेली आहेत ती अतिशय चुकीची आणि संशयास्पद आहेत. जागेची साफसफाई करणे व थुट काढणे यासाठी १७०० रुपये देण्यात आले होते. परंतु स्थायी रोपवाटिका असल्यामुळे साफसफाईची गरज भासली नाही. जागेची नागरणी व फेर नागरणी करण्यासाठी ३४०० रुपये देण्यात आले होते. तसेच पाच वेळा निंदणी करणे व १ वेळा खत देण्यासाठी ५८८२ रुपयांचा निधी देण्यात आला होता. मात्र या ठिकाणी आवश्यकतेनुसार निंदणीचे काम केल्यामुळे ३४६८ रुपये इतका खर्च झाला असून ५८८२ रुपये इतका खर्च झाला नाही. वन विभागामार्फत ६५ रोपवाटिकांमध्ये ५८५४ रोपांची निर्मिती करण्यात आली आहे आणि वृक्ष लागवडीकरिता १२०० खड्डे खोदण्यात आलेले आहेत. यावर जिल्हाधिकारी यांनी समितीला माहिती दिली की, १०० कोटी वृक्ष लागवडीच्या बाबतीत दोन वर्षांकरता लक्षांक देण्यात आला होता यामध्ये १८ वर्षांच्या वरील रोपेच लावावी लागतात. फॉरेस्ट विभागाने नर्सरी तयार केलेली असून यावर्षी १४ रोपे लावण्यात आलेली आहेत.

सन २००७-०८ मध्ये आर्वी तालुक्यात ४९ हेक्टरवर ९५,५०० सागवृक्ष लागवडीचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात २८.६५ हेक्टरवर ५१,५२५ रोपे लावण्यात आली. त्यापैकी मे-२०१० अखेर केवळ ५९३० रोपे जिवंत होती. याचाच अर्थ लागवड केलेल्या रोपांपैकी १० टक्के रोपे सुद्धा जिवंत नाहीत. सागवृक्ष लागवडीवर एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी खर्च करूनही त्यातून काहीही साध्य होत नाही. आर्वी तालुक्यात सागवृक्ष लागवडीच्या कार्यक्रमावर सन २००७-०८ मध्ये खर्च करण्यात आलेल्या रकमेचे तपशील अवगत करण्यात यावे अशी समितीने विचारणा केली असता उप संचालक, सामाजिक वनीकरण, वर्धा यांनी समितीला माहिती दिली की, ही योजना वैयक्तिक लाभार्थी स्वरूपाची आहे. लाभार्थ्यांची निवड करताना ते ॲप्रोच होतात. त्यांच्या पिकांचा हिशेब आणि रेकॉर्ड दिला जात नाही. त्यामुळेच ही आकडेवारी कमी कमी होते. आपण केवळ रोपांचा पुरवठा करतो. रोपांची लागवड आणि त्यांच्या देखभालीचा खर्च हा लाभार्थ्यांनी स्वतः करावयाचा असतो. लाभार्थ्यांना पहिल्या नमुन्यात ९०,६८२ आणि दुसऱ्या नमुन्यात १ लाख ४३ रोपे देण्यात आले. त्यापैकी एका नमुन्यातील लागवड मृत झाली. परिणामी लाभार्थ्यांना दुसऱ्या वर्षी केवळ ५९६८ रोपे देण्यात आली तिसऱ्या वर्षी जिवंत झाडांच्या प्रमाणात केवळ ६८० रोपांचे वाटप केले. शासन निर्णयानुसार जिवंत रोपांच्या टक्केवारीनुसार पैसे द्यावे लागतात. आर्वी तालुक्यातील २२ लाभार्थ्यांनी ३५,९०० रोपांची लागवड केली. प्रत्येक लाभार्थ्यांचे नमुने वेगवेगळे होते. या संदर्भात विभागीय सचिवांनी माहिती दिली की, जवाहर विहिर, फळबाग लागवड, सामाजिक वनीकरण या वैयक्तीक लाभाच्या योजना असून या योजनांतर्गत प्रतिपूर्तीची रक्कम अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी देण्यात येते.

सन २००८-०९ मध्ये तुतीची लागवड करण्यात न आल्याने त्याबाबतची कारणे स्पष्ट करावीत तसेच तुतीची लागवड करण्यासंबधी लाभार्थ्यांच्या निवडी संदर्भात माहिती देण्यात यावी, सिंचनाची सोय नसल्यास तसेच लाभार्थ्यांनी किती एकरापर्यंत तुतीची लागवड करावी यासंबंधातील शासन निर्णय असल्याने लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती द्यावी अशी समितीने विचारणा केली असता रेशीम विकास अधिकारी, वर्धा यांनी समितीला माहिती दिली की, प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी एक समूह व समूहाचे क्षेत्र किमान २० एकर असल्यास तुती लागवडीच्या समूहास योजना लागू राहील. सन २००८-०९ मध्ये तुतीची लागवड करण्यात आली होती. तसेच ज्या लाभार्थ्यांच्या सिंचनाची व्यवस्था असते त्यांचीच निवड करण्यात येते. एका समूहामध्ये २० एकरावर तुतीची लागवड करण्यात आली असेल त्यांनाच रोहयो मार्फत अनुदान देण्यात येते. यानंतर समितीने सूचित केल्यानुसार सहसचिव यांनी जी.आर. मधील पृष्ठ दोन वरील मजकुराबाबत पुढीलप्रमाणे माहिती दिली

**योजनेचे लाभार्थी.**—गावातील निवडलेल्या अनुसूचित जाती /जमाती, नवबौद्ध व भटक्या जमाती, विमुक्त जाती, अल्प व अत्यल्प भूधारक (नाबार्डने केलेल्या व्याख्याप्रमाणे) तसेच लहान इतर सर्व शेतकरी हे या योजनेअंतर्गत लाभधारक असतील. यासाठी लाभधारक शेतकऱ्यांकडील कमीत कमी २० गुंठे (अर्धा एकर) पासून २.५० एकर क्षेत्रात ही योजना राबविता येईल.

लाभार्थ्यांना द्यावयाचे अनुदानाचे प्रमाण : (१) अनुसूचित जाती/जमाती, नवबौध्द, भटक्या जमाती, विमुक्त जाती व अल्प, अत्यल्प भुधारक (२) इतर सर्व शेतकऱ्यांच्या स्वतःच्या शेतावर हा कार्यक्रम राबविता येईल. लाभधारकांनी प्रत्यक्ष शेतावर काम करून तुती लागवड करावयाची असून लागवडीद्वारे रेशीम किटकांचे संगोपन करून रेशीम कोषांचे उत्पादन करावयाचे आहे. तुती बेणे, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर मार्फत पुरविण्यात येईल. त्यावरील खर्च राज्य स्तरीय योजनेमधून शासनाने ठरवून दिलेल्या पद्धतीप्रमाणे करण्यात यावा. या लाभार्थ्यांना परिशिष्ट १ मध्ये दर्शविलेल्या मंजूर प्रमाणकाप्रमाणे मजुरीवर झालेला खर्च व अत्यावश्यक साधन सामुग्री वरील खर्चाची रक्कम १०० टक्के अनुदान म्हणून देण्यात येईल. तर सर्व शेतकऱ्यांच्या बाबतीतही हा कार्यक्रम राबविताना मंजूर प्रमाणकाप्रमाणे मजुरीवर झालेला खर्च १०० टक्के आणि साधनसामुग्री वरील खर्चाच्या रकमेच्या ७५ टक्के अनुदान म्हणून देण्यात येईल. यावर जिल्हाधिकारी, वर्धा यांनी माहिती दिली आहे की, जी स्पष्टीकरणामध्ये माहिती दिलेली आहे त्यामध्ये नमूद केले आहे की, दिनांक २५ ऑगस्ट, २००० नुसार एका समूहाकरिता कमीत कमी २० एकर क्षेत्राचा निकष पूर्ण होत नसल्याने रोजगार हमी योजनेचे अनुदान प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाहीत.

**अभिप्राय व शिफारशी :—**

सामाजिक वनीकरणा अंतर्गत झाडांची लागवड केल्यानंतर लावलेली झाडे १०० टक्के कशी जिवंत राहतील याची काळजी घेतली पाहिजे व तशी व्यवस्था केली पाहिजे. झाडांची रोपे किमान एक-दोन वर्षे रोपवाटिकेमध्ये वाढविली पाहिजेत. मनुष्यबळ उपलब्ध असताना देखील रोजगार हमी योजनेची कामे व्यवस्थीत होत नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांना या कामात स्वारस्य नसल्याचे मत समिती व्यक्त करते. झाडाच्या लागवडी संदर्भात केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून वृक्षारोपण अधिकाअधिक चांगल्या रितीने करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावे व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

तुती लागवडीच्या संदर्भात प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी एक समूह व समूहाचे क्षेत्र किमान २० एकर असेल त्यांनाच अनुदान देण्यात येते. तथापि, तुती लागवडीबाबत स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, तुती लागवडीबाबत ४९.५० एकराचे सर्व्हेक्षण करण्यात आले. व त्यापैकी ३५ एकर क्षेत्रावर तुती लागवड करण्यात आली. परंतु सदरहू लाभार्थी शासन निर्णयाप्रमाणे निकषात बसत नसल्याचे सांगून त्यांना अनुदान देण्यात आले नाही. वास्तवीक निकषात बसत नसताना संबंधित अधिकाऱ्यांनी या योजनेअंतर्गत मान्यता देऊन लाभार्थ्यांना अनुदानापासून वंचित केले आहे. शासनाच्या योजनेचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे. तो देण्यात यावा व अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे लाभार्थ्यांना लाभ मिळू शकला नाही. याबाबत संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

## परिशिष्ट - एक

अपूर्ण कामे

## प्रश्न क्र. ९ अपुर्ण कामे (मागील तिमाही अखेर)

काम सुरु झाल्यापासून अपुर्ण असलेल्या कामावावतचे माहिती.

१ ते ५ वर्षे, ६ ते १० वर्ष व १० वर्षापेक्षा जास्त कालावधीतील अपुर्ण कामाची माहिती.

| अ.क्र. | जिल्हा | अपुर्ण कामाची संख्या | | कामे अपुर्ण असल्याची कारणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वन जमीन अभावी | भुसंपादन अभावी | सुधारीत अंदाजपत्रकाअभावी | मजुरा अभावी | कुशल निधी अभावी | इतर कारणामुळे | प्रगती पथावर | शेरा |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | वर्धा | १ ते ५ वर्षा पेक्षा जास्त कालावधी लोटलेली कामे - निरंक | | | | | | | | | |
| २ | | ६ ते १० वर्षा पेक्षा जास्त कालावधी लोटलेली कामे निरंक | | | | | | | | | |
| ३ | | १० वर्षा पेक्षा जास्त कालावधी लोटलेली कामे | | | | | | | | | |
| | | अनु क्र. | यंत्रणा | | | | | | | | |
| | | १ | लघु पाटबंधारे विभाग वर्धा (राज्यस्तर) | वन जमीनीमुळे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | वन विभागाच्या मागणीनुसार एन.पी.व्ही मुल्य किंमत ११.४८ लक्ष वन विभागास भरणे आहे.शासनास कार्यालयाचे पत्र दिनांक २६.९.०८ नुसार काम रोजगार हमी योजनेतुन वगळण्यावावत किंवा निधी उपलब्ध करुन देणेवावत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच वनतळे म्हणुन काम करण्यावावतचा प्रस्ताव उपवनसंरक्षक, वनविभाग वर्धा यांना पुनश्चः सादर करण्यावावतची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| एकुण | | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

| अ.क्र | यंत्रणा निहाय अपुर्ण कामाची संख्या | अपुर्ण कामाचे नाव व कामाचा प्रकार (पाझर तलाव, गाव तलाव, मालगुजारी तलाव, वनतळी,रस्ते, वनीकरण, मृदुसंधारण, कृषी (इत्यादी) | मुळ अंदाज पत्रकानुसार कामाची किंमत किती होती | मुळ अंदाज पत्रकासह तांत्रीक व प्रशासकीय मान्यता मिळाल्याची तारीख (उदा.) ता.मा./तारीख/प्र.मा. तारीख) | काम सुरु झाल्याची तारीख व काम बंद असल्यास त्यांची तारीख (उदा. काम सुरु तारीख/काम बंद तारीख) | आतापर्यंत कामावर झालेला एकूण खर्च | कामे बंद वा अपुर्ण असल्याची कारणे (उदा. भुसंपादन अभावी, मजूरा अभावी, वन जमीन हरकत इत्यादी) | आयुक्त कार्यालयामार्फत कामावर झालेल्या एकूण खर्चाची व कामाची तपासणी करण्यात आली आहे काय व केव्हा | अपुर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखून ती अग्रक्रमाने पुर्ण करण्याबाबत केलेली अथवा करावयाची उपाय योजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १० वर्षा पेक्षा जास्त कालावधी लोटलेली कामे | | | | | | | |
| ३ | १/ कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग,स्थानिक स्तर, वर्धा | गणेशपुर गावतलाव | १.५६ | ९.१०.८४<br>२८.१०.८४ | ९.४.८७<br>२६.८.८८ | ४.८० | वन जमिनीमुळे | होय | वन विभागाच्या मागणीनुसार एन.पी.व्ही मुल्य किंमत ११.४८ लक्ष वन विभागास भरणे आहे.शासनास कार्यालयाचे पत्र दिनांक २६.९.०८ नुसार काम रोजगार हमी योजनेतुन संगळण्यावावत किंवा निधी उपलब्ध करुन देणेबावत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.तसेच वन तळ म्हणुन काम करण्यावावतचा प्रस्ताव उपवनसंरक्षक वनविभाग वर्धा यांना पुनश्चः सादर करण्यावावतची कार्यवाही करण्यात येते आहे. |
| | एकुण | ०४ कामे | १.५६ | | | ४.८० | | | |

# परिशिष्ट - दोन

## बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

(शा.म.मु.) एचबी १९३३—४ (७००—११-२०१२)

**बुधवार, दिनांक ७ सप्टेंबर २०११**

समितीची अनौपचारिक बैठक शासकीय विश्रामगृह, वर्धा येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते :

**समिती प्रमुख :**

(१) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स

(३) श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.

(४) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.

(५) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.

(६) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(७) श्री. दादाराव केचे, वि.स.स.

(८) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

(९) श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स.

(१०) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.

(११) श्री. संजय राठोड, वि.स.स.

(१२) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(१३) श्री. सुभाष चव्हाण, वि.स.स.

(१४) श्री. केशवराव मानकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव.

(२) श्री. एन. जी. काले, अवर सचिव (समिती).

**वर्धा जिल्हा स्थानिक लोकप्रतिनिधी :**

(१) श्री. विजयकुमार जयस्वाल, अध्यक्ष, जिल्हा परिषद, वर्धा

(२) श्री. महानाम शंकरराव रामटेके, सभापती, बांधकाम समिती, जिल्हा परिषद, वर्धा

(३) श्री. शिवलाल जाधव, सभापती, पंचायत समिती, आर्वी

(४) सौ. पुष्पा सं. लांबट, सभापती, पंचायत समिती, देवळी

(५) श्रीमती वत्सला अ. सोमकुवर, सभापती, पंचायत समिती, कारंजा

(६) सौ. शालुबाई विठ्ठलराव इवनाते, सभापती, पंचायत समिती, वर्धा

(७) सौ. इंदिरा शां. उरकुडकर, सभापती, पंचायत समिती, हिंगणघाट

(८) सौ. निलिमा अशोकराव दंढारे, सभापती, पंचायत समिती, सेलु.

**क्षेत्रिय अधिकारी, वर्धा :**

(१) श्रीमती जयश्री भोज, जिल्हाधिकारी, वर्धा

(२) श्री. शेखर चन्ने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(३) श्री. संजय दैने, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), वर्धा

(४) श्री. अे. के. आझाद, उपजिल्हाधिकारी (रोहयो), वर्धा

(५) श्री. बी. एस. बन्हाटे, अधीक्षक, कृषी अधिकारी, वर्धा

सदरहू बैठकीत समितीने जिल्ह्यात सुरू असलेल्या कामांबाबत चर्चा केली व त्यानंतर समितीने जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांना भेटी दिल्या.

## गुरुवार, दिनांक ८ सप्टेंबर २०११

समितीची बैठक, विकास भवन, वर्धा येथे घेण्यात आली आहे. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते :—

**समिती प्रमुख :**

(१) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.
(३) श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.
(४) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.
(५) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.
(६) श्री. दादाराव केचे, वि.स.स.
(७) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.
(८) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(९) श्री. संजय राठोड, वि.स.स.
(१०) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(११) श्री. सुभाष चव्हाण, वि.स.स.
(१२) श्री. केशवराव मानकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव
(२) श्री. एन. जी. काले, अवर सचिव (विधी)
(३) श्री. श्रीकांत शेट्ये, कक्ष अधिकारी

**आयुक्त कार्यालय, नागपूर :**

श्री. एम. ए. एच. खान, उपायुक्त (रोहयो)

**नियोजन विभाग, (रोहयो), मंत्रालय, मुंबई :**

श्री. ज. भि. पवार, कक्ष अधिकारी

**उपस्थित अधिकारी :**

श्रीमती जयश्री भोज, जिल्हाधिकारी, वर्धा
श्री. शेखर चन्ने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा
डॉ. शे. ही पाटील, मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, नागपूर
श्री. संजय दैने, प्रभारी अपर जिल्हाधिकारी
श्री. आर. आर. खवले, निवासी उपजिल्हाधिकारी
श्री. अे. के. आझाद, उपजिल्हाधिकारी (रोहयो),
श्री. दि. दि. पोहेकर, अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर
श्री. दि. ना. जनरोडे, अधीक्षक अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर
श्री. बळवंत लुंगे, अधीक्षक अभियंता, सां.बा. मंडळ, चंद्रपूर
श्री. बी. एम. मोहन, प्रकल्प संचालक, जिग्राविय
श्री. विपुल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
श्री. पी. डी. चव्हाण, उप वनसंरक्षक, वर्धा वन विभाग, वर्धा
श्री. प्रविण बडगे, उप संचालक, सामाजिक वनीकरण

श्री. बी. एस. बऱ्हाटे, अधीक्षक, जिल्हा कृषी अधिकारी

श्री. एस. ए. सहारे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

श्री. पी. एस. गणाचार्य, जिल्हा रेशीम विकास अधिकारी

श्री. प्र. गु. नागपूरकर, कार्यकारी अभियंता, वर्धा घाट

श्री. आ. तु. देवगडे, कार्यकारी अभियंता, निवप्र व कार्यकारी अभियंता लपावि (प्रभारी)

श्री. दि. ग. बारापात्रे, कार्यकारी अभियंता, निवहा विभाग

श्री. बी. आर. बोकडे, कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर), नागपूर

श्री. एन. एन. देशपांडे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा

श्री. किशोर तेलरांधे, कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, वर्धा,

श्री. प्र. र. जनबंधू, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी

श्री. सुनिल कोरडे, उप विभागीय अधिकारी, आर्वी

श्री. उमेश काळे, उप विभागीय अधिकारी, हिंगणघाट

श्री. हरिष धार्मिक, उप विभागीय अधिकारी, वर्धा

श्री. सुशांत बनसोडे, तहसीलदार, वर्धा

श्री. जी. एन. करलुके, तहसीलदार, आर्वी

श्री. एस. जे. मांडवी, तहसीलदार, कारंजा (घा)

श्री. सचिन गोसावी, तहसीलदार, देवळी

श्री. अनिल गावीत, तहसीलदार, सेलू

श्री. राहूल सारंग, तहसीलदार, आष्टी

श्री. यु. एम. तोडसाम, तहसीलदार, समुद्रपूर

श्री. जी. टी. पुरके, तहसीलदार, हिंगणघाट

श्री. एस. डी. वानखेडे, गट विकास अधिकारी, आर्वी

श्री. अ. वि. किटे, गट विकास अधिकारी, कारंजा (घा.)

श्री. ए. एल. खाडे, गट विकास अधिकारी, सेलू

श्री. बी. एम. मोघावत, गट विकास अधिकारी, आष्टी

श्री. आर. एम. पवार, गट विकास अधिकारी, वर्धा

श्री. एम. के. भांडारकर, गट विकास अधिकारी, समुद्रपूर

श्री. सुभाष मानकर, गट विकास अधिकारी, देवळी

या बैठकीत वर्धा जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामातील अडचणी व उणिवा तसेच रोहयोच्या कामांना भेटी दिल्यानंतर आढळून आलेल्या त्रुटीबाबत जिल्हाधिकारी व ही योजना राबविणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणांचे अधिकारी यांच्याशी समितीने चर्चा केली व समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीच्या संदर्भात जिल्हाधिकारी व रोजगार हमी योजनेशी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेचे प्रमुख यांच्याशी चर्चा केली.

## मंगळवार, दिनांक ४ सप्टेंबर, २०१२

मंगळवार, दिनांक ४ सप्टेंबर २०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे समितीची बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**समिती प्रमुख :**

(१) ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. अनिल वावनकर, वि.स.स.

(३) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.

(४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(५) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स.

(६) डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.

(७) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

(८) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(९) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.

(१०) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(११) श्री. भगवान साळुंखे, वि.प.स.

(१२) डॉ. दीपक सावंत, वि.प.स., निमंत्रित

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव

श्री. ज. व. विचारे, अवर सचिव (समिती)

**आयुक्त कार्यालय, नागपूर :**

श्री. एम. ए. एच. खान, उप आयुक्त (रोहयो)

**नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय :**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव,

श्री. व. कृ. पाटील, उप सचिव

**जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा :**

श्रीमती जयश्री भोज, जिल्हाधिकारी

**जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा :**

श्री. शेखर चन्ने, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. भा. आर. बऱ्हाटे, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी

श्री. बडगे, उप संचालक, सामाजिक वनीकरण

श्रीमती प्रिया नायक, रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-२

श्री. गोडसे, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे, वर्धा

या बैठकीत वर्धा जिल्ह्यातील रोहयोंच्या कामासंबंधात वर्धा जिल्हा बैठकीच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनाबाबत व त्या संदर्भातील समितीच्या प्रश्नावलीनुसार नियोजन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०१२

रोजगार हमी योजना समितीची बैठक बुधवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०१२ रोजी दुपारी १.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

**समिती प्रमुख :**

(१) ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.

(३) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.

(४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(५) डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.

(६) प्रा. अतुल देशकर, वि.स.स.

(७) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(८) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

(९) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.

(१०) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(११) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१२) श्री. भगवान साळुंखे, वि.प.स.

(१३) डॉ. दिपक सावंत, वि.प.स. (निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव

श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)

दिनांक ७ नोव्हेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत समितीने वर्धा जिल्ह्यासंदर्भातील विसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून आवश्यक त्या सुधारणांसह अहवाल संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई